**<u>गोपनीय</u>**

**क्रमांक : का.स./बैठक/२६६**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : २७ ऑक्टोबर, २०२०

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी दूरचित्रसंवाद (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे झालेल्या २६६ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

२७/१०/२०२०

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रती,**

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - अध्यक्ष

श्री. जयंत कुमार बांठिया
१००३/१००४, १० वा मजला,
बिल्डींग नं.३-ए, ग्रीन एकर्स,
लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी (प),
मुंबई — ४०० ०५३ - सदस्य

श्री. ना. वि. मेराणी
ए/४७, आदर्श नगर,
वरळी, मुंबई - ४०० ०२५. - सदस्य

डॉ. शिरीष संख्ये
संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,
एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,
नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. - सदस्य

महानगर आयुक्त
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण - सदस्य

महापालिका आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१. - सदस्य

प्रधान सचिव (१),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

अतिरिक्त महानगर आयुक्त-१ व प्रकल्प संचालक, मुं.म.प्र.वि.प्रा.

अतिरिक्त महानगर आयुक्त-२, मुं.म.प्र.वि.प्रा.

सह महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा.

****

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या
## २६६व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **१५ ऑक्टोबर, २०२० (गुरूवार)** |
| **वेळ** | **:** | **सकाळी ११.०० वाजता** |
| **स्थळ** | **:** | **मा. मुख्य सचिव यांचे समिती कक्ष<br>मंत्रालय,<br>मुंबई – ४०० ०३२.<br>दूरचित्रसंवाद (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे** |

**उपस्थित सदस्य :**

श्री. संजय कुमार - अध्यक्ष
मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन

श्री. जयंत कुमार बाँठिया - सदस्य

श्री. आर.ए.राजीव - सदस्य
महानगर आयुक्त
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण

श्री. भूषण गगराणी - सदस्य
प्रधान सचिव (१),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री. एस.व्हि.आर.श्रीनिवास - सदस्य
प्रधान सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन

डॉ. संजय मुखर्जी - सदस्य
व्यवस्थापकीय संचालक,
सिडको,

**निमंत्रित :**

श्री. मनोज सौनिक
अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री. महेश पाठक
प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग व
सामान्य प्रशासन विभाग (विशेष प्रकल्प) (अ.का.)
महाराष्ट्र शासन

श्री. वेणूगोपाल रेड्डी
प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन

डॉ. सोनिया सेठी
अतिरिक्त महानगर आयुक्त (१)/प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

डॉ. के.एच.गोविंद राज
अतिरिक्त महानगर आयुक्त (२),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

डॉ. बी.जी.पवार
सह-महानगर आयुक्त
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मूर्ती
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

कु. उमा अडुसुमिली
प्रमुख, नियोजन विभाग /
परिवहन व दळणवळण विभाग, (अ.का.),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्तीय सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.एम.एस. नारकर
मुख्य अभियंता (अ.का.),
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती सु.भू.पेदे
सचिव, कार्यकारी समिती
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी श्री. संजय कुमार, मा.मुख्य सचिव यांचे कार्यकारी समितीचे नवे ‘अध्यक्ष’ म्हणून स्वागत केले.

त्यानंतर, श्री. आय.एस.चहल, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री. भूषण गगराणी, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग, श्री. एस.व्हि.आर.श्रीनिवास, प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग व डॉ. संजय मुखर्जी, व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांचे नवे ‘पदसिध्द सदस्य’, तसेच श्रीमती मनिषा म्हैसकर, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांचे ‘पदसिध्द निमंत्रित सदस्य’ म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

तसेच श्री. अजोय मेहता, तत्कालीन मुख्य सचिव यांनी अध्यक्ष, कार्यकारी समिती म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. तसेच, श्री. प्रविण परदेशी, तत्कालीन महापालिका आयुक्त व अप्पर मुख्य सचिव (१), नगर विकास विभाग, श्री.संजय कुमार, तत्कालीन अप्पर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, श्री.आय.एस.चहल, तत्कालीन प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग व श्री. लोकेशचंद्र, तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी ‘पदसिध्द सदस्य’ तसेच श्री. अनिल डिग्गीकर, तत्कालीन प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी ‘पदसिध्द निमंत्रित सदस्य’ म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा महानगर आयुक्त यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी झालेल्या २६५व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी झालेल्या २६५व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र. ३ : मेट्रो प्रकल्प २अ व ७ च्या मेट्रो स्थानकांमध्ये बहुवाहतुक परिवहन एकत्रिकरण (Multi Modal Integration MMI) प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता कंत्राटदार नियुक्तीसाठी ई-निविदेला मंजुरी मिळण्याबाबत.**

३.१ सदर प्रकल्पाबाबत माहिती देताना अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी असे सांगितले की, मेट्रो स्थानकांमध्ये प्रवेश सुलभता, गतिशीलता व अंतिम गंतव्य स्थानापर्यंत वाहतूक (last mile connectivity) सेवा उपलब्ध करण्यासाठी प्राधिकरणाने मुंबई मेट्रो स्थानकांवर बहुवाहतूक परिवहन एकत्रिकरणाची (Multi Modal Integration - MMI) योजना तयार केली आहे. तसेच प्रस्तावित मेट्रो मार्ग २अ व ७ मधील ३० स्थानकांसाठी बहुवाहतूक परिवहन एकत्रिकरण प्रकल्पाच्या टप्पा १ (०-२५० मी. त्रिज्येचे क्षेत्र) अंमलबजावणीसाठी ई- निविदेने ०४ पॅकेज विभागून प्रस्ताव मागविण्यात आले असल्याचे नमूद केले.

३.२ अति. महानगर आयुक्त (१) यांनी प्रकल्पाची सविस्तर माहिती देताना असे सांगितले की, निविदा चार पॅकेजमध्ये प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर दिनांक ३१ जानेवारी, २०२० रोजी उपलब्ध करण्यात आली, तसेच इंग्रजी व मराठी दैनिक वृत्तपत्रात दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२० रोजी निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली. निविदा पूर्व बैठक दिनांक १८ फेब्रुवारी, २०२० रोजी घेण्यात आली. निविदा पूर्व बैठकीत व तद्नंतर उपस्थित केलेल्या मुद्यांचे स्पष्टीकरण (CSD १ & २) प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. ई-निविदा प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक १४ जुलै, २०२० पर्यंत होता. त्यानुसार प्राप्त झालेल्या निविदा दिनांक १६ जुलै, २०२० रोजी लिफाफा ‘अ’(निविदा किंमत) व ‘ब’ (तांत्रिक प्रस्ताव) दिनांक २९ जुलै, २०२० रोजी उघडण्यात आल्या, ज्यामध्ये खालील निविदाकांरानी ०४ पॅकेजमध्ये पुढील नुसार निविदा प्रस्ताव सादर केले :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| पॅकेज -१ | १. मे. लॅन्डमार्क कॉर्पोरेशन प्रा. लि.<br>२. मे. आर. पी. एस. इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. |
| पॅकेज -२ | १. मे. वित्राग इन्फ्रा प्रोजेक्ट्स<br>२. मे. रेलकॉन इन्फ्रा प्रोजेक्ट्स |
| पॅकेज -३ | १. मे. के. आर. कन्स्ट्रक्शन<br>२. मे. लॅन्डमार्क कॉर्पोरेशन प्रा. लि.<br>३. मे. एन. ए. कन्सट्रक्शन प्रा. लि. |
| पॅकेज -४ | १. मे. के. आर. कन्स्ट्रक्शन<br>२. मे. रेलकॉन इन्फ्रा प्रोजेक्ट्स<br>३. मे. आर. पी. एस. इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. |

वरील प्रमाणे ०४ पॅकेजमध्ये प्राप्त झालेल्या निविदांची तांत्रिक छाननी करून निविदामधील नमूद पात्रतेनुसार सर्व निविदाकारांना तांत्रिक दृष्टिने पात्र ठरविले. त्याप्रमाणे त्यांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा- क) दिनांक १३ ऑगस्ट २०२० रोजी उघडण्यात आले. उघडलेल्या सर्व ई-निविदांची वित्तीय देकारांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| **अ.क्र.** | **निविदाकारांचे नाव /कंत्राटदाराचे नाव** | **मूळ पॅकेज किंमत GST सह (रु.)** | **वित्तीय प्रस्ताव % अधिक (+)** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| पॅकेज -१ | मे. लॅन्डमार्क कॉर्पोरेशन प्रा. लि. | ७५,०४,५४,९१५/- | +१७.३०% | |
| | **मे. आर. पी. एस. इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि.** | | **+१६.०४%** | **लघुत्तम** |
| पॅकेज -२ | मे. वित्राग इन्फ्रा प्रोजेक्ट्स | ८९,२२,९४,४२८/- | +९.९९% | |
| | **मे. रेलकॉन इन्फ्रा प्रोजेक्ट्स** | | **+८.८२%** | **लघुत्तम** |
| पॅकेज -३ | मे. के. आर. कन्स्ट्रक्शन | ८२,७६,३८,२९३/- | +२०.५०% | |
| | मे. लॅन्डमार्क कॉर्पोरेशन प्रा. लि. | | +१७.२०% | |
| | **मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा. लि.** | | **+१५.००%** | **लघुत्तम** |
| पॅकेज -४ | **मे. के. आर. कन्स्ट्रक्शन** | ७७,३८,३६,३०३/- | **+११.१६%** | **लघुत्तम** |
| | मे. रेलकॉन इन्फ्रा प्रोजेक्ट्स | | +१७.२०% | |
| | मे. आर. पी. एस. इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. | | +२०.८०% | |

३.३ अति. महानगर आयुक्त (१) यांनी असेही सांगितले की, लघुत्तम असलेल्या निविदाकारांबरोबर निविदा शिफारस समितीने दिनांक २१ ऑगस्ट,२०२० व दिनांक २५ ऑगस्ट, २०२० रोजी वाटाघाटी केल्यानंतर सदर निविदाकारांनी निविदेच्या खाली दिल्याप्रमाणे अंदाजित किंमतीत काम पार पाडण्यासाठी सहमती दिली असून सदर प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे :-

| **अ.क्र.** | **कंत्राटदाराचे नाव** | **मूळ पॅकेज किंमत GST सह (रु.)** | **लघुत्तम निविदाकारा तर्फे सुधारीत रक्कम GST सह (रु.)** | **% तफावत** |
|---|---|---|---|---|
| पॅकेज-१ | मे. आर. पी. एस. इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. | ७५,०४,५४,९१५/- | ७५,०४,५४,९१५/- | ०.००% |
| पॅकेज-२ | मे. रेलकॉन इन्फ्रा प्रोजेक्ट | ८९,२२,९४,४२८/- | ८९,२२,९४,४२८/- | ०.००% |
| पॅकेज-३ | मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन | ८२,७६,३८,२९३/- | ८२,७६,३८,२९३/- | ०.००% |
| पॅकेज-४ | मे. के. आर. कन्स्ट्रक्शन | ७७,३८,३६,३०३/- | ७७,३८,३६,३०३/- | ०.००% |

**निर्णय :-** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३९३ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे, मेट्रो मार्ग २अ व ७ च्या ३० स्थानकांमध्ये बहुवाहतूक परिवहन एकत्रीकरण प्रकल्पाचे बांधकामासाठी ०४ पॅकेज मधील लघुत्तम निविदाकारांनी सादर केलेल्या सुधारित वित्तीय देकार (सममूल्य असल्याने - AT PAR/TENDER COST) खालील प्रमाणे स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, सदर कामाची निकड लक्षात घेता बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता काम तात्काळ सुरू करण्यास सुध्दा मान्यता देत आहे :-

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | मूळ पॅकेज किंमत GST सह (रु.) | लघुत्तम निविदाकारा तर्फे सुधारीत रक्कम GST सह (रु.) | % तफावत |
|---|---|---|---|---|
| पॅकेज-१ | मे. आर. पी. एस. इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. | ७५,०४,५४,९१५/- | ७५,०४,५४,९१५/- | ०.००% |
| पॅकेज-२ | मे. रेलकॉन इन्फ्रा प्रोजेक्ट | ८९,२२,९४,४२८/- | ८९,२२,९४,४२८/- | ०.००% |
| पॅकेज-३ | मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ८२,७६,३८,२९३/- | ८२,७६,३८,२९३/- | ०.००% |
| पॅकेज-४ | मे. के. आर. कन्स्ट्रक्शन | ७७,३८,३६,३०३/- | ७७,३८,३६,३०३/- | ०.००% |

"**असाही ठराव करण्यात येत आहे की**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ४:** **मेट्रो मार्ग-७ (अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) अंतर्गत पॅकेज क्र. – २ (सीए – ०२) मधील अतिरिक्त कामामुळे होणाऱ्या वाढीव खर्चास मंजूरी देणेबाबत.**

४.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मेट्रो मार्ग-७ ची ८१% स्थापत्य कामे पुर्णत्वास आली असून स्थानकांच्या छतांची, आर्किटेक्चर, रुळ बसविण्याची कामे व प्रणालीचे कामे इ. हाती घेण्यात आली आहेत. माहे जानेवारी २०२१ मध्ये प्रकल्पाची चाचणी घेऊन माहे मे, २०२१ मध्ये प्रकल्प पूर्णत्वाचे उद्दीष्ट आहे.

४.२ त्यानंतर अतिरीक्त महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावावर सादरीकरण करताना असे नमुद केले की, मेट्रो मार्ग-७ मधील पॅकेज - २ (CA-०२) चे काम निविदेतील एकूण किंमतीच्या ११.४% कमी दराने (म्हणजेच रु.३६०.२१ कोटीस) कंत्राटदार मेसर्स जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लिमीटेड यांस प्रदान करण्यात आले व सद्यस्थितीत ते प्रगतीपथावर व पूर्णत्वाच्या अंतिम टप्प्यात असून सुमारे ९०% काम पूर्ण झाले आहे. मुख्यत्वे Viaduct कामे पूर्ण झाली असून स्थानकांची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर काम करताना मुळ कामात अंतर्भुत नसलेली परंतु निकडीची असणारी प्रकल्प संलग्न वाढीव / अतिरिक्त कामे (Extra Items) करणे गरजेचे होते.

४.३ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी मुख्यकामांची माहिती देताना असे नमूद केले की, मेट्रो मार्ग ७ व २अ साठी लागणा-या मेट्रोच्या डब्यांची निर्मिती मेक इन इंडिया कार्यक्रमाअंतर्गत प्रथमच भारतात बनविण्यात आले. यातील पहिला डबा ऑगस्ट, २०१९ मध्ये तयार करण्यात आला. त्याबद्दलची माहिती व त्यांची वैशिष्टे सामान्य जनतेला कळावीत यासाठी प्रदर्शन केंद्र वांद्रे -कुर्ला संकुल, मुंबई येथे बनविण्याचे ठरविण्यात आले. सदर प्रकल्प भविष्यातील मेट्रो स्थानकांसाठी मार्गदर्शक प्रकल्प बनावा यासाठी सदर प्रदर्शन केंद्राची बांधणी प्रगतीपथावर असणाऱ्या मेट्रो मार्ग ७ व २अ च्या स्थानकांशी मिळती-जुळती व सुसंगत असावी असे ठरविण्यात आले. मेट्रोचा डबा ऑगस्ट, २०१९ मध्ये मुंबईत दाखल होत असल्याने प्रदर्शन केंद्राचे कार्य शीघ्र गतीने बनविणे अपेक्षित होते. त्यादृष्टीने सदरील काम मेट्रो मार्ग २अ व ७ वर काम करण्या-या कंत्राटदाराकडून करवून घेण्याचे ठरले. त्यावेळी काम सुरु असणाऱ्या एकूण ३० मेट्रो स्थानकांपैकी (मेट्रो मार्ग २अ व ७ ची एकूण स्थानके) २२ स्थानकांचे काम मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लिमीटेडच्या मार्फत सुरू होते व त्यांची प्रगती समाधानकारक होती, यास्तव सध्या बनत असणा-या मेट्रो स्थानकांशी सुसंगत असणारे प्रदर्शन केंद्र बनविण्याचे काम मेसर्स जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लिमीटेडच्या मार्फत मेट्रो मार्ग-७ मधील पॅकेज २ च्या अंतर्गत करण्यात आले. प्रदर्शन केंद्र बांधण्याकरीता रू. ११.७५ कोटी इतक्या अतिरिक्त खर्चास मान्यता घेण्यात आली. सदर प्रदर्शन केंद्राचे व मेट्रो डब्याचे उद्घाटन दिनांक ०७.०९.२०१९ रोजी मा. पंतप्रधान यांचे हस्ते करण्यात आले.

४.४ अतिरीक्त महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सागितले की, मुंबई मेट्रो ची स्थानके आधुनिक वास्तुरचनेनुसार (Modern Architectural) करणेसाठी मेट्रो मार्ग-७ वरील

आकुर्ली (जुने नाव बाणडोंगरी) स्थानकाची (कामे सर्वाधिक प्रगतीपथावर असल्याने) मार्गदर्शक स्थानक (Model Station) करणेसाठी निवड करण्यात आली. सदर वास्तुरचनेची कामे मार्गदर्शक्र स्थानक म्हणून लवकरात लवकर पूर्ण करावी व त्या अनुषंगाने मार्गदर्शक तत्वे तयार करुन इतर स्थानकांची वास्तुरचना करण्याचे ठरविण्यात आले. यासाठी आकुर्ली स्थानकाच्या वास्तुरचनेची कामे लवकर होणे अपेक्षित होते. यास्तव सदर आकुर्ली स्थानकाच्या आर्किटेक्चरल फिनिशिंगची कामे सदर स्थानकाच्या स्थापत्य कंत्राटदारामार्फत म्हणजेच CA-०२ मधून करण्यात आली. त्यापैकी आजवर रू. २८.६८ कोटींची अंदाजपत्रके मंजुर झाली आहेत. त्याअनुषंगाने मार्गदर्शक तत्वांनुसार मेट्रो मार्ग ७ व २अ च्या इतर सर्व स्थानकांसाठी आराखडा बनवुन त्या स्थानकांची कामे प्रगतीपथावर आहेत.

४.५ अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, पॅकेज २ मधील बहुतांश ठिकाणी अपेक्षित डिझाईन स्ट्रेंग्थ न मिळाल्याने काही ठिकाणी पाईल फाउंडेशनची लांबी कंत्राटामधे नमूद असल्यापेक्षा अधिक करावी लागली. यास्तव सुमारे १०.७७ कोटी इतका अतिरिक्त खर्च झाला आहे. मेट्रो मार्गिकेची अंमलबजावणी करताना जमिनीखाली पायास अडथळा असणा-या विविध प्रकारच्या सेवा वाहिन्या आढळल्या. सदर सेवा सेवावाहिन्या स्थलांतरित करणेकरिता लागणारा वेळ व खर्च लक्षात घेता, अनेक ठिकाणी मेट्रो पायाच्या (मेट्रो फाउंडेशन) आराखडयात बदल करुन सेवा वाहिन्या स्थलांतर न करता काम करण्यात आले. पायाच्या आराखड्यात झालेले बदल कंत्राटानुसार मुळ कामात अतंर्भुत नसल्याने यामुळे झालेल्या वाढीव कामासाठी अतिरिक्त खर्च अपेक्षित आहे. मेट्रो स्थानकांच्या नियोजनादरम्यान स्थापित पध्दतीनुसार जिन्यांचा अंतर्भाव करण्यात आला होता. परंतु वाढीव प्रावधान करण्याच्या दृष्टिने सदर जिन्यांची संख्या वाढविण्यात आली व जमिनीवरुन कॉनकोर्स स्तरावर जाण्यासाठी असणारे जिने, उद्वाहक, सरकते जिनेनुसार नवीन संरचना करण्यात आली व त्यामुळे सदर प्रवेश - निर्गमन रचना तसेच स्थांनकाची लांबी व रुंदी वाढलेली आहे. कंत्राटानुसार मेट्रो स्थानकांची रुंदी १८.५ मीटर इतकी होती परंतु स्थानक निर्मितीच्या सर्व मार्गदर्शक तत्वांचा विचार करुन स्थानकांची रुंदी १९.७ मीटर इतकी करण्यात आली.

४.६ अतिरीक्त महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमुद केले की, वरील बाबींसह पॅकेज – २ (CA-०२) अंतर्गत इतर प्रकल्प संलग्न वाढीव व अतिरिक्त कामांसाठी कंत्राटीय रक्कमेच्या

सुमारे रु.११६.१२ कोटी (कंत्राटीय रक्कमेच्या सुमारे ३२.२४%) इतका अधिक खर्च होणे अंदाजित असून त्याचे विवरण खालीलप्रमाणे आहे :

| Sr. No | Description | Amount (Rs.) |
|---|---|---|
| **Approved Works** | | |
| 1 | Construction of Metro Car Display Unit Exhibition centre at MMRDA Ground BKC | 11,75,38,665.00 |
| 2 | Architectural finishing and Façade works at Akurli Metro Station | 28,67,83,662.89 |
| 3 | Foundations variations due to infringement of utilities (Pile cap) | 4,46,67,479.75 |
| 4 | Variation due to changes in area of station from NIT Drawings | 14,37,78,180.12 |
| 5 | Pile depth Variations | 10,77,06,725.00 |
| 6 | Estimate for Construction of FOB Structural Steel at Bandongri station | 3,14,94,932.00 |
| 7 | Estimate for additional steel in viaduct U Girder | 1,41,53,747.00 |
| 8 | Extra lead of precast element transportation | 71,46,948.00 |
| 9 | Mahindra & Mahindra station box area cutting, levelling and disposal work | 38,69,862.00 |
| 10 | Construction of storm water drain outside the entrance of Bandra casting yard | 16,48,177.40 |
| 11 | Supplying Traffic warden for traffic police | 31,60,297.04 |
| 12 | Providing 01 no of Tempo for traffic related wok up to Dindoshi Traffic Police | 23,07,000.00 |
| 13 | Supply & Fixing of central median at P101 to P114 | 12,12,281.00 |
| 14 | Supply Plastic traffic barricades to Dindoshi & Dahisar Traffic police | 9,26,319.00 |
| A | **Total approved variation / extra items** | **76,63,94,276.20** |
| | **Total variations w.r.t. contract cost in %** | **21.276%** |
| **Proposed Works** | | |
| 15 | Shifting of Tata Communication Optic fibre cable at Dindoshi | 11,73,014.00 |
| 16 | Increased Length of Viaduct | 14,74,127.00 |
| 17 | Diversion of Water line at Aarey & Pathanwadi | 81,91,764.00 |
| 18 | Providing Tapered wedge plate for U-Girders | 1,38,62,626.00 |
| 19 | Variation for Normal Pier To Cantilever Pier & Portal Pier | 4,00,29,456.00 |
| 20 | Variation for Additional Pile casting | 2,13,14,772.00 |
| 21 | Demolition of Existing Structures at land for Station works | 24,05,910.00 |
| 22 | Decking sheet for I-Girder Deck Slab casting | 52,18,368.00 |
| 23 | Concourse Level to Platform Level Staircase due to increase in numbers | 1,50,00,000.00 |

| | | |
|---|---|---|
| 24 | Road improvement work at P8-P17 | 2,19,23,764.00 |
| 25 | Diversion of utilitis at Station Entry Exit Structures | |
| 25 (a) | Aarey Station | 50,00,000.00 |
| 25 (b) | Dindoshi Station | 50,00,000.00 |
| 25 (c) | Kurar Station | 5,00,00,000.00 |
| 25 (d) | Akurli Station | 25,00,000.00 |
| 26 | Architectural Works of Entry Exit at Bandongri station. | 1,50,00,000.00 |
| 27 | Variation due to Crossover Deck slab Vs. normal deck slab | 20,87,760.00 |
| 28 | Variation due to Extra block work at Stations | 1,25,00,000.00 |
| 29 | Variation due to Structural Changes of Entry Exit at Kurar Station | 10,00,00,000.00 |
| 30 | Other miscellaneous works ( @ 2 % of accepted cost) | 7,20,41,647.48 |
| B | **Total of expected additional variations** | **39,47,23,209.19** |
| | **Total proposed variations w.r.t. contract cost in %** | **10.96%** |
| | **Grand Total variation / extra item (A+B)** | **116,11,17,485.00** |
| | **Grand Total variation /extra item (A+B) cost in %** | **32.24%** |

४.७ अतिरीक्त महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मेट्रो मार्ग - ७ च्या पॅकेज २ (CA-०२) कंत्राटाची रक्कम रु. ३६०.२१ कोटी इतकी असून त्यापैकी माहे जुलै, २०२० पर्यंत कंत्राटातील बाबींसाठी आणि अतिरिक्त बाबी व कंत्राटातील बाबींच्या परिमाणातील वाढीपोटी एकूण रु. ३६५.९४ कोटी इतका खर्च अदा करण्यात आलेला आहे. एकूण अतिरिक्त बाबी व वाढीव कामांसाठी रु. ११६.१२ कोटी (कंत्राटीय रकमेच्या सुमारे ३२.२४%) इतका खर्च अंदाजित आहे. यास्तव कंत्राटातील तरतूदींनुसार देय असलेल्या भाववाढीच्या खर्चा व्यतिरिक्त पॅकेज ०२ ची सुधारीत रक्कम रु.४७६.३२ कोटी इतकी होणे अपेक्षित आहे.

४.८ अतिरीक्त महानगर आयुक्त यांनी असे नमुद केले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या २१.०७.२०१५ रोजी झालेल्या २४५ व्या कार्यकारी समितीच्या बैठकीतील ठराव क्र. १२८९ अन्वये कार्य प्रगतीपथावर असताना कंत्राटात नमूद नसलेल्या अतिरिक्त बाबी (Extra Items) व कंत्राटातील बाबीच्या परिमाणांमधील वाढीपोटी (Excess Quantities) कंत्राटाच्या मंजूर रकमेच्या २०% पर्यंत खर्च व त्याव्यतिरिक्त कंत्राटातील तरतूदींनुसार देय असलेला भाववाढीचा खर्च मंजूर करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत.

४.९ अतिरीक्त महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मेट्रो मार्ग -७ च्या पॅकेज २ (CA-०२) संदर्भातील वरील सर्व बाबी व उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता, मेट्रो मार्ग-७ च्या पॅकेज २ (CA-०२) मध्ये कंत्राटात नमूद नसलेल्या वाढीव कामे, अतिरिक्त बाबी (Extra Items) व कंत्राटातील बाबींच्या परिमाणांमधील वाढीपोटी (Excess Quantities) कंत्राटात मंजूर रक्कमेच्या ३२.२४% (रु.११६.१२ कोटी) पर्यंत खर्चास मंजूरी मिळणेकरिता कार्यकारी समितीस प्रस्ताव सादर करण्यात आला. महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, पॅकेज ०२ साठी निविदेची रक्कम रु. ४०६.७३ कोटी इतकी होती व सदर काम निविदेच्या एकूण किंमतीच्या ११.४% कमी दराने म्हणजेच रु. ३६०.२१ कोटी कंत्राटदारास प्रदान करण्यात आली. यास्तव अतिरिक्त बाबींवर होणारा वर नमुद केलेला खर्च हा निविदा रक्कमेच्या १७.१०% इतका अधिक आहे.

४.१० चर्चेदरम्यान कार्यकारी समितीचे सदस्य श्री. जयंत कुमार बॅाठिया यांनी बाब टिप्पणीमधील नमुद केलेल्या प्रस्तावित कामावर खर्च करण्यात आला आहे का? तसेच वाढीव खर्चाची कारणे व आतापर्यंत झालेला खर्च यासंबंधी विचारणा केली. यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की मुंबईच्या रस्त्यावर असणा-या अनेक प्रकारच्या सेवा वाहिन्यांचे जाळे जमिनीखाली असल्यामुळे त्यांच्या अचूक जागेबद्दल माहिती उपलब्ध नसते. त्यामुळे या कामांसाठी लागणारा खर्चाचा विचार निविदा तयार करतेवेळी करणे शक्य होत नाही. त्याचबरोबर अनेक ठिकाणी जल वाहिन्या, नाले, गॅस पाईप लाईन, मेट्रो पियरची पायाभरणी, आगमन व निर्गमन, उद्वाहन, सरकते जिने, जिने यांची पायाभरणी, इत्यादी बाबींचे स्थलांतर करणे अत्यंत कठीण असल्यामुळे पायाभरणीची पुनर्रचना करावी लागते आणि त्याप्रमाणे काम करावे लागते तसेच बाब टिप्पणीमध्ये प्रस्तावित केलेल्या कामावर आतापर्यंत खर्च करण्यात आलेला नसून सदर खर्च कार्यकारी समितीची मान्यता मिळाल्यानंतर करण्यात येईल.

४.११ त्यानंतर, कार्यकारी समितीचे सदस्य श्री. जयंत कुमार बॅाठिया यांनी सदर मेट्रो मार्ग-७ च्या मान्यता प्राप्त प्रकल्प खर्चाव्यतिरिक्त होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यासाठीच्या प्राधिकरणाच्या धोरणासंबंधी विचारणा केली. याबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, अतिरिक्त बाबी (Extra Items) व कंत्राटातील बाबीच्या परिमाणांमधील वाढीपोटी (Excess Quantities) कंत्राटाच्या मंजूर रक्कमेच्या २०% पर्यंत खर्च व त्याव्यतिरिक्त कंत्राटातील तरतूदींनुसार

देय असलेला भाववाढीचा खर्च मंजूर करण्यास कार्यकारी समितीने या अगोदरच मान्यता दिली असून त्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करणेत आले आहेत. तसेच मेट्रो मार्ग ७ प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी प्राधिकरणाने व राज्य शासनाने मान्यता दिलेल्या एकूण प्रकल्प किंमतीत म्हणजेच रु. ६,२०८/- कोटीमध्ये वरील अतिरिक्त कामांमुळे होणा-या वाढीव खर्चामुळे कोणतीही वाढ होणार नाही.

**निर्णय: सविस्तर चर्चेनंतर, बाब टिपणीतीत प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-**

**ठराव क्र.१३९४:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) व (५) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे मुंबई मेट्रो मार्ग - ७ (अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) अंतर्गत पॅकेज क्र. २ साठी, कंत्राटात नमूद नसलेल्या वाढीव कामे, अतिरिक्त बाबी (Extra Items) व कंत्राटातील बाबींच्या परिमाणांमधील वाढीपोटी (Excess Quantities) कंत्राटात मंजूर रक्कमेच्या ३२.२४% (रु.११६.१२ कोटी) पर्यंत खर्च करण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय असलेल्या भाववाढीचा खर्च मंजूर करण्यास मान्यता देत आहे. तसेच, सदर कामाची निकड लक्षात घेता बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता काम तात्काळ सुरू करण्यास सुध्दा मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र. ५: मेट्रो मार्ग-७ (अंधेरी (पू.) ते दहिसर (पू.) अंतर्गत पॅकेज क्र. – ३ (सीए – ०३) मधील अतिरिक्त कामामुळे होणाऱ्या वाढीव खर्चास मंजूरी देणेबाबत.**

५.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मेट्रो मार्ग - ७ ची ८१% स्थापत्य कामे पुर्णत्वास आली असून, स्थानकांच्या छतांची,

आर्किटेक्चर, रुळ बसविण्याची कामे व प्रणालीची कामे इ. हाती घेण्यात आली आहेत. माहे जानेवारी, २०२१ मध्ये प्रकल्पाची चाचणी घेऊन माहे मे, २०२१ मध्ये प्रकल्प पूर्णत्वाचे उद्दीष्ट आहे.

५.२ त्यानंतर अति. महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाचे सादरीकरण करताना असे नमूद केले की, मेट्रो मार्ग ७ मधील पॅकेज - ३ चे काम निविदेतील एकूण किंमतीच्या ९.८% कमी दराने (म्हणजेच रु.२४९.८६ कोटीस) कंत्राटदार मेसर्स एन. सी. सी. लिमीटेड यास प्रदान करण्यात आले व सद्यस्थितीत ते प्रगतीपथावर व पूर्णत्वाच्या अंतिम टप्प्यात असून सुमारे ८५.५२% काम पूर्ण झाले आहे. मुख्यत्वे Viaduct कामे पूर्ण झाली असून स्थानकांची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर काम करताना मुळ कामात अंतर्भुत नसलेली परंतु निकडीची असणारी प्रकल्प संलग्न वाढीव /अतिरिक्त कामे (Extra Items) करणे गरजेचे होते.

५.३ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी मुख्य कामांची माहिती देताना असे नमूद केले की, मेट्रो मार्ग ७ चे बांधकाम सुरू झाल्यानंतर लोकप्रतिनिधीकडून जनतेच्या सोयीसाठी मेट्रो मार्ग-७ मिरा भाईंदरपर्यंत वाढविण्याची विनंती करण्यात आली व त्यास शासनाकडून मान्यता मिळाली. सदर नवीन मेट्रो मार्गही मेट्रो मार्ग -७ शी जोडून एकत्रीकरण करणे आवश्यक आहे. जेणेकरून मिराभाईंदर मेट्रो द्वारे आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत जोडले जाणे शक्य होईल. सदर भाग हा मेट्रो मार्ग ७ शी संलग्न असल्यामुळे त्याचे बांधकाम मेट्रो मार्ग ७ पॅकेज - ३ च्या कंत्राटातुन करणे निकडीचे होते. सदर कामासाठी गणन करण्यात आलेला अतिरिक्त खर्च हा रु. ३०.२४ कोटी इतका आहे. वाढीव खर्चातील मिरा-भाईंदर या नव्या मेट्रो मार्ग अविभक्त असलेले काम करण्यासाठी १२.१०% इतका खर्च हा प्रकल्पाचे काम सुरू झाल्यानंतर उत्पन्न झालेल्या बाबींमुळे झाला आहे.

५.४ अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमूद केले की, मेट्रो स्थानकांच्या नियोजना दरम्यान स्थापित पद्धतीनुसार जिन्यांचा अंतर्भाव करण्यात आला होता. परंतु, वाढीव प्रावधान करण्याच्या दृष्टीकोनातून सदर जिन्यांची संख्या वाढविण्यात आली व जमिनीवरुन कॉनकोर्स स्थरावर जाण्यासाठी असणारे जिने, उदवाहक, सरकते जिनेनुसार नविन संरचना करण्यात येत आहे व त्यामुळे सदर आगमन/निर्गमन रचना (Entry/Exit Structure) तसेच स्थानंकाची लांबी व रुंदी वाढलेली आहे. मेट्रो मार्ग-७, पॅकेज - ३ मध्ये देवीपाडा स्थानकाच्या बांधकामाने

धार्मिकस्थळे बाधित होत असल्याने सदर जमीन अधिग्रहण करणे जिकरीचे आहे. यास्तव स्थानकाची पुर्नरचना करून त्यातील आगमन/निर्गमन यासाठी (Entry/Exit Structure) स्थानकाच्या दहिसर दिशेस मेट्रोशी संलग्न आवश्यक बाबींसाठी लागणाऱ्या खोल्यांचा समावेश असणा-या वेगळ्या इमारतीचा अंतर्भाव करून त्याची स्थानकाशी जोडणी करण्यात आली. सदर इमारतीसाठी लागणारी जमीन ही सहजतेने उपलब्ध झाली. याकरिता सुमारे रु. १५.५४ कोटीचा (स्विकारलेल्या देकाराच्या ६.२२%) खर्च अपेक्षित आहे. मेट्रो मार्गांचे अंमलबजावणी करताना आखणी मार्गात पियरची पायाभरणी व खोदकाम करत असताना विविध सेवावाहिन्या आढळल्या. पॅकेज ३ मधे बहुतांश पियरच्या पायामध्ये विविध सेवावाहिन्या आढळून आल्या. सदर ठिकाणी काम करताना सेवावाहिन्या स्थलांतरीत करणे आवश्यक होते. परंतु सेवावाहिन्या स्थलांतरीत करणे करिता लागणारा वेळ व खर्च लक्षात घेता, शक्य तितक्या ठिकाणी मेट्रो पायाच्या (मेट्रो फाउंडेशन) आराखडयात बदल करुन काम करण्यात आले. सदर बदल मुळ कामात अतंर्भुत नसल्याने अतिरीक्त कामासाठी वाढीव खर्च अपेक्षित आहे. याकरीता १३.८७ कोटींची (स्विकारलेल्या देकाराच्या ५.५५ %) खर्च अपेक्षित आहे.

५.५ अति. महानगर आयुक्त यांनी असेही, नमूद केले की, वरील बाबींसह पॅकेज-३ (CA-०३) अंतर्गत इतर अतिरिक्त संलग्न कामे करण्याकरीता सुमारे रू.७९.७९ कोटी (कंत्राटीय रकमेच्या ३१. ९४%) इतका खर्च होणे अंदाजित असून त्याचे विवरण खालीलप्रमाणे आहे :-

**मंजुर अतिरिक्त बाबींची यादी**

| अ. क्र. | तपशील | मंजूर रक्कम |
|---|---|---|
| **मंजूर कामे** | | |
| १ | कंत्राटामधील तरतुदीनुसार पाइलच्या लांबीतील तफावत | ४,३५,५४,०९६.०० |
| २ | पायाच्या कामाच्या प्रमाणातील तफावत रक्कम | २,५७,४८,८५३.०० |
| ३ | पिअर प्रमाणामधील तफावत रक्कम | २७,६८,२२५.०० |
| ४ | इसेंट्रिक पिअर कॅपची तफावत रक्कम | ८,०१,०९६.०० |
| ५ | यू गर्डर मधील सळयांच्या प्रमाणामधील तफावत रक्कम | १,१३,४५,३७८.०० |

| अ. क्र. | तपशील | मंजूर रक्कम |
|---|---|---|
| ६ | पिअर कॅप आणि यु गर्डरची अतिरिक्त वाहतूकीसाठीची तफावत रक्कम | २,७९,०३,५०८.०० |
| ७ | वाहतूक पोलिसांसाठी पुरविण्यात आलेली टेम्पो भाडेची रक्कम | ११,७२,१२९.०० |
| ८ | कामादरम्यान वाहतूक नियोजनासाठी लागणारे मनुष्यबळ पुरविण्यातील तफावत रक्कम | १,००,१२,२५५.०० |
| ९ | मीरा भायंदर या नव्या मेट्रोमार्गासाठी अविभक्त असलेले काम करण्यासाठी लागणारी तफावत रक्कम | ३०,२४,६६,३९०.०० |
| १० | पॅकेज 01 मध्ये केलेल्या कामाची तफावत रक्कम | १,७१,१५,२५६.०० |
| ११ | स्थानकाच्या क्षेत्रफळामधील फरकामुळे होणारी तफावत रक्कम | ५,६७,००,०००.०० |
| | **एकूण रक्कम** | **४९,९५,८७,१८६.००** |
| | **टक्केवारीतील कराराच्या किंमतीशी संबंधित एकूण मंजूर तफावत रक्कम** | **१९.९९%** |
| **प्रस्तावित कामे** | | |
| १ | स्टेशनचे क्षेत्रफळ तफावत रक्कम | ९,८७,४३,०१४.०० |
| २ | स्टेशनचे अतिरिक्त जिना, पुनर्रचना शुल्क, अतिरिक्त डांबरी शीट , संरक्षण भीत, अतिरिक्त डेकची शीट तफावत रक्कम | ३,२२,४३,०९१.०० |
| ३ | पाइल आणि पाइल कॅपच्या प्रमाणामधील तफावत रक्कम | ११,३०,००,०००.०० |
| ४ | वेज प्लेटची अतिरिक्त बाबींची तफावत रक्कम | ४४,००,०००.०० |
| ५ | अतिरिक्त इतर कामे (कंत्राटाच्या २%) | ४,९९,७१,८०३.०० |
| | **अपेक्षित अतिरिक्त तफावत एकूण** | **२९,८३,५७,९०८.००** |
| | **टक्केवारीतील कराराच्या किंमतीशी संबंधित एकूण अपेक्षित अतिरिक्त तफावत रक्कम** | **११.९४%** |
| अ | कराराचा खर्च (रु.) | २,४९,८५,९०,१५०.०० |
| ब | मंजूर फरक किंमत (रु.) | ४९,९५,८७,१८६.०० |
| क | अपेक्षित अतिरिक्त तफावत खर्च (रु.) | २९,८३,५७,९०८.०० |
| ड | पॅकेज-03 ची अपेक्षित सुधारित किंमत (भाव वाढ वगळता) = ( अ+ ब +क ) | **३,२९,६५,३५,२४४.००** |

५.६ अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मेट्रो मार्ग - ७ च्या पॅकेज-३ (CA-०३) कंत्राटाची रक्कम रु. २४९.८६ कोटी इतकी असून त्यापैकी माहे ऑगस्ट, २०२० पर्यंत कंत्राटातील बाबींसाठी रु.१८९.७० कोटी व अतिरिक्त बाबीं व कंत्राटातील बाबींच्या परिमाणातील वाढीपोटी रु.३५.१६ कोटी (कंत्राटीय रकमेच्या सुमारे १४.०७%) असा एकूण रु. २२४.८६ कोटी (कंत्राटातील तरतूदींनुसार देय असलेला भाववाढीच्या खर्चाव्यतिरिक्त)

इतका खर्च अदा करण्यात आलेला आहे. एकूण अतिरिक्त बाबी व वाढीव कामांसाठी रु. ७९.७९ कोटी (कंत्राटीय रकमेच्या सुमारे ३०.२४%) इतका खर्च अंदाजित आहे. यास्तव पॅकेज ०३ ची सुधारीत रक्कम रु.३२९.६५ कोटी इतकी होणे अपेक्षित आहे .

५.७ अति. महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, दिनांक २१.०७.२०१५ रोजी झालेल्या २४५ व्या कार्यकारी समितीच्या बैठकीतील ठराव क्र. १२८९ अन्वये कार्य प्रगतीपथावर असताना कंत्राटात नमूद नसलेल्या अतिरिक्त बाबी (Extra Items) व कंत्राटातील बाबीच्या परिमाणांमधील वाढीपोटी (Excess Quantities) कंत्राटाच्या मंजूर रक्कमेच्या २०% पर्यंत खर्च व त्या व्यतिरिक्त कंत्राटातील तरतूदींनुसार देय असलेला भाववाढीचा खर्च मंजूर करणे यांस संमती दिली असून त्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत.

५.८ अति. महानगर आयुक्त यांनी असेही नमूद केले की, मेट्रो मार्ग - ७ च्या पॅकेज ३ संदर्भातील वरील सर्व बाबी व उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता, मेट्रो मार्ग - ७ च्या पॅकेज ३ मध्ये कंत्राटात नमूद नसलेल्या अतिरिक्त बाबी (Extra Items) व कंत्राटातील बाबींच्या परिमाणांमधील वाढीपोटी (Excess Quantities) कंत्राटाच्या मंजूर रक्कमेच्या ३१.९४% (रु.७९.७९ कोटी), पर्यंत खर्चास मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव कार्यकारी समितीस मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

५.९ चर्चेच्या अनुषंगाने कार्यकारी समितीचे सदस्य श्री. जयंत कुमार बॅांठिया यांनी बाब टिप्पणीमधील नमुद केलेल्या प्रस्तावित कामावर खर्च करण्यात आला आहे का? तसेच वाढीव खर्चाची कारणे व आतापर्यंत झालेला खर्च यासंबंधी विचारणा केली. यावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की मुंबईच्या रस्त्यावर असणा-या अनेक प्रकारच्या सेवा वाहिन्यांचे जाळे जमिनीखाली असल्यामुळे त्यांच्या अचूक जागेबद्दल माहिती उपलब्ध नसते. त्यामुळे या कामांसाठी लागणारा खर्चाचा विचार निविदा तयार करतेवेळी करणे शक्य होत नाही. त्याचबरोबर अनेक ठिकाणी जल वाहिन्या, नाले, गॅस पाईप लाईन, मेट्रो पियरची पायाभरणी, आगमन व निर्गमन, उद्वाहन, सरकते जिने, जिने यांची पायाभरणी, इत्यादी बाबींचे स्थलांतर करणे अत्यंत कठीण असल्यामुळे पायाभरणीची पुनर्रचना करावी लागते आणि त्याप्रमाणे काम करावे लागते तसेच बाब टिप्पणीमध्ये प्रस्तावित केलेल्या कामावर आतापर्यंत खर्च करण्यात आलेला नसून सदर खर्च कार्यकारी समितीची मान्यता मिळाल्यानंतर करण्यात येईल.

..१७/-

५.१० त्यानंतर, कार्यकारी समितीचे सदस्य श्री. जयंत कुमार बॅाठिया यांनी सदर मेट्रो मार्ग-७ च्या मान्यता प्राप्त प्रकल्प खर्चाव्यतिरिक्त होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यासाठीच्या प्राधिकरणाच्या धोरणासंबंधी विचारणा केली. याविषयावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, अतिरिक्त बाबी (Extra Items) व कंत्राटातील बाबीच्या परिमाणांमधील वाढीपोटी (Excess Quantities) कंत्राटाच्या मंजूर रक्कमेच्या २०% पर्यंत खर्च व त्याव्यतिरिक्त कंत्राटातील तरतूदींनुसार देय असलेला भाववाढीचा खर्च मंजूर करण्यास कार्यकारी समितीने या अगोदरच मान्यता दिली असून त्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत. तसेच मेट्रो मार्ग-७ प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी प्राधिकरणाने व राज्य शासनाने मान्यता दिलेल्या एकूण प्रकल्प किंमतीत म्हणजेच रु. ६,२०८/- कोटीमध्ये वरील अतिरिक्त कामांमुळे होणा-या वाढीव खर्चामुळे कोणतीही वाढ होणार नाही.

**निर्णय :** **चर्चेनंतर, बाब टिपणीतीत प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

<u>ठराव क्र. १३९५ :</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्रधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) व (५) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कंत्राटात नमूद नसलेल्या वाढीव कामे, अतिरिक्त बाबी (Extra Items) व कंत्राटातील बाबींच्या परिमाणांमधील वाढीपोटी (Excess Quantities) कंत्राटात मंजूर रकमेच्या ३१.९४% (रु.७९.७९ कोटी) पर्यंत खर्च करण्यास व त्या व्यतिरिक्त कंत्राटातील तरतूदींनुसार देय असलेल्या भाववाढीचा खर्च मंजूर करण्यास मान्यता देत आहे. तसेच, सदर कामाची निकड लक्षात घेता बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता काम तात्काळ सुरू करण्यास सुध्दा मान्यता देत आहे

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**<u>बाब क्र. ६:</u>** **<u>मेट्रो मार्ग-२ब डी.एन.नगर – मंडाळे या मेट्रो मार्गाकरीता मंडाळे येथील कारशेडच्या (पॅकेज सीए - १४) चे उर्वरीत बांधकामाकरीता पॅकेज सी – १०३ अंतर्गत मागविलेल्या ई-निविदांना मंजूरी देणेबाबत.</u>**

६.१. सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि. १७ मार्च २०१६ रोजी झालेल्या १३९ व्या बैठकीत तसेच २५ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मेट्रो मार्ग २ब डि.एन.नगर - मंडाळे या उन्नत मेट्रो मार्गाची उभारणी करणे या प्रकल्पासाठी रु.१०,९८६/- कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता दिली आहे.

६.२. अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी प्रस्तावाचे सादरीकरण करताना असे सांगितले की, मेट्रो मार्ग-२ब डि. एन. नगर – मंडाळे या मेट्रो मार्गाकरीता मंडाळे, मानखुर्द येथे डेपोच्या बांधकामाकरीता (पॅकेज सीए-१४) नोंव्हेबर, २०१७ मध्ये ई निविदा (निविदा किंमत रु. ४१५.२ कोटी) मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदा प्रक्रिये अंतर्गत मे. एम.बी.झेड-आर.सी.सी. (जे.व्ही.) यांची रु. ३९०.४३ कोटी (५.९३% कमी) दराची लघुत्तम निविदा प्राप्त झाली. प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी झालेल्या २५६ व्या बैठकीत मे. एम.बी.झेड-आर.सी.सी. (जे.व्ही.) यांची निविदा स्विकृत करण्यास मान्यता देण्यात आली. मेट्रो मार्ग २ब मेट्रो डेपोचे कंत्राटदार मे. एम.बी.झेड-आर.सी.सी.(जे.व्ही) यांना दि. १९/०१/२०१८ रोजी कार्यादेश देण्यात आला होता. परंतू कामाच्या ४२ महिन्यांच्या कालावधीतील २४ महिने उलटून गेल्यानंतरही मे. एम.बी.झेड-आर.सी.सी. (जे.व्ही) यांनी फक्त ७% काम पुर्ण केले होते. प्रकल्प पुर्ण करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, बांधकाम साहित्य व यंत्रसामुग्री उपलब्ध करणे मे. एम.बी.झेड-आर.सी.सी. (जे.व्ही) यांना शक्य झाले नाही. तसेच कामाची प्रगती राखण्यात कंत्राटदार अपयशी ठरल्याने निविदा अटी व शर्तीनुसार कामाचा करारनामा दि. ३१/०१/२०२० रोजी रद्द करण्यात आला. तद्नंतर मंडाळे मेट्रो डेपो, मेट्रो मार्ग २ब या कामासाठी कंत्राटदार मे. एम.बी.झेड-आर.सी.सी. (जे.व्ही.) यांनी केलेली कामाची किंमत वगळून, प्रणाली शाखेच्या आवश्यकतेनुसार कामाच्या व्याप्तीत वाढ झाली. तसेच नोव्हेंबर, २०१७ ते जानेवारी, २०२० या कालावधीसाठी ५% प्रती वर्ष प्रमाणे भाववाढ गृहीत धरुन रु. ४६४.७५ कोटी किंमतीच्या कामासाठी फेर निविदा मागविण्यात आल्या.

..१९/-

पूर्वीचे कंत्राटदार मे. एम.बी.झेड-आर.सी.सी. (जे.व्ही.), पॅकेज सीए-१४ यांनी सादर केलेल्या बँकेची प्रतिपूर्ती हमी जप्त करण्यात आलेली आहे, त्यानुसार रु. ४२.९० कोटी सुरक्षा अनामत रक्कम कंत्राटदाराचा करारमाना रद्द झाल्यामुळे प्राधिकरणाकडे जमा झाली आहे.

६.३ अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी निविदा प्रक्रियेसंबंधी माहिती देताना असे सांगितले की, मेट्रो मार्ग २ब मंडाळे डेपोच्या स्थापत्य कामाकरीता (पॅकेज सी-१०३) फेर ई-निविदा फेब्रुवारी, २०२० मध्ये मागविण्यात आल्या. या कामाचा लिफाफा 'अ' दि. ०६/०७/२०२० रोजी व लिफाफा 'ब' दि. २२/०७/२०२० रोजी निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आला. या निविदा प्रक्रियेत ६ निविदाकारांनी ई-निविदा सादर केल्या. प्राप्त ई- निविदांच्या पात्रतेची तांत्रिक छाननी मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाचे सल्लागार मे. आयका कॉन्सॉरटीयम (AICA Consortium) मार्फत करण्यात आली व सदर छाननीचा अहवाल प्राधिकरणास सादर केला. निविदाकारांचा पात्र/अपात्रतेचा अहवाल खालील प्रमाणे आहे :-

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | पॅकेज सी १०३ |
|---|---|---|
| १. | मे. एन.सी.सी. लि. | पात्र |
| २. | मे. अॅफकॉन्स इन्फ्रा स्ट्रक्चरर्स लि. | पात्र |
| ३. | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. | अपात्र |
| ४. | मे. अहलुवालिया कॉन्ट्रक्स (इं) लि. | पात्र |
| ५. | मे. कॅपासाईट इन्फ्रा प्रोजेक्ट्स. लि. | अपात्र |
| ६. | मे. मनाज इन्फ्रा कॅन्स्ट्रक्शन लि. | अपात्र |

अपात्र निविदाकारांबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे: -

अ. मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांनी सादर केलेल्या दस्तावेजानुसार प्रस्तावित कामाच्या किंमतीच्या ४०% किंमतीच्या तीन सारख्या कामाचा अनुभव आवश्यक होता. मे. रेलकॉन यांनी सादर केलेल्या तीन कामांपैकी दोन कामे पात्र ठरली. परंतू तिसऱ्या कामाची किंमत मुंबई महानगर पालिकेकडून प्राप्त दि. ०८/०९/२०२० रोजीच्या पत्रानुसार आवश्यक किंमतीपेक्षा कमी असल्याने, निविदा निकष पूर्ण करीत नसल्याचे निष्पन्न झाले. सबब मे. रेलकॉन यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली.

ब. मे. कॅपासाईट इन्फ्रा प्रोजेक्ट्स. लि. यांनी सादर केलेल्या दस्तावेजानुसार ५०% किंमतीच्या दोन सारख्या कामाचा अनुभव आवश्यक होता. मे. कॅपासाईट यांनी सादर केलेल्या दोन कामांपैकी एक काम पात्र ठरले. परंतू दुसरे काम कमर्शिअल इमारतीचे काम नसून संमिश्र वापराच्या (mixed use) इमारतीचे असल्याने सदर काम निविदा निकष पूर्ण करीत नव्हते. सबब मे. कॅपासाईट यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली.

क. मे. मनाज इन्फ्रा कॅन्स्ट्रक्शन लि. यांनी सादर केलेल्या दस्तावेजानुसार आवश्यक कामाचा अनुभव, मूळ (Parent) कंपनीच्या सबसिडरी कंपनीचा व आर्थिक निकष मूळ (Parent) कंपनीचे सादर केले होते. सदर बाबत मे. मनाज इन्फ्रा कॅन्स्ट्रक्शन लि. यांचे पात्रतेविषयी मे. कांगा कंपनी ( Law Firm) यांचे कडून अभिप्राय मागविण्यात आले. सदर बाबत मे. कांगा कंपनी यांनी दिलेल्या अभिप्रायाप्रमाणे मे. मनाज इन्फ्रा कॅन्स्ट्रक्शन लि. यांची निविदा, निकष पूर्ण करीत नव्हती. सबब मे. मनाज इन्फ्रा कॅन्स्ट्रक्शन लि. यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली.

६.५ प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या निविदांच्या छाननीसाठी प्राधिकरणाने खालीलप्रमाणे निविदा शिफारस समिती गठीत केली आहे.

(१) अतिरिक्त महानगर आयुक्त तथा प्रकल्प संचालक :- अध्यक्ष

(२) संचालक (प्रकल्प), मेट्रो :- सदस्य

(३) वित्तीय सल्लागार :- सदस्य

(४) संचालक (प्रणाली), मेट्रो :- सदस्य

(५) मुख्य अभियंता (शहर), बृहन्मुंबई महानगर पालिका :- सदस्य

दि. ०५/१०/२०२० रोजी झालेल्या निविदा शिफारस समितीच्या बैठकीत वरील पात्र निविदाकारांचा आर्थिक देकार (लिफाफा ‘क’) उघडण्यासाठी शिफारस करण्यात आली. पात्र निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा ‘क’) दि ०६/१०/२०२० रोजी उघडण्यात आले. सदर प्रमाणे प्राप्त आर्थिक देकाराची (लिफाफा ‘क’) छाननी मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाचे साधारण

सल्लागार M/s. AICA Consortium यांचेमार्फत करण्यात आली. सदर छाननीचा अहवाल सल्लागाराने दि. ०९/१०/२०२० रोजी सादर केला. सदर अहवालानुसार निविदाकारांच्या आर्थिक देकारांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे :-

| अ. क्र | निविदाकारांचे नाव | निविदेची रक्कम (रू.) (वस्तू व सेवा करासह) | प्राप्त देकार रक्कम (रू.) (वस्तू व सेवा करासह) | % अधिक |
|---|---|---|---|---|
| १. | मे. एन.सी.सी. लि. | ४६४,७५,११,४२४.५० | ५५४,९०,८३,४१४.८४ | १९.४०% |
| २. | मे. ॲफकॉन्स इन्फ्रा स्ट्रक्चरस् लि. | ४६४,७५,११,४२४.५० | ५८७,११,९३,४१८.०० | २६.३३% |
| ३. | मे. अहलुवालिया कॉन्ट्रक्स (इं) लि. | ४६४,७५,११,४२४.५० | ५४३,२७,६७,२१७.८६ | १६.९०% |

६.६. मंडाळे डेपोच्या स्थापत्य कामाकरीता (पॅकेज सी-१०३) करीता मे. अहलुवालिया कॉन्ट्रॅक्ट्स (इं) लि. यांचा निविदा किंमतीपेक्षा १६.९० % अधिक दराचा (रु.५४३,२७,६७,२१७.८६ कोटी) देकार हा लघुत्तम देकार आहे. सदर लघुत्तम देकार निविदा किंमतीपेक्षा अधिक दराचा असल्याने प्राधिकारणाने मे. अहलुवालिया कॉन्ट्रॅक्ट्स (इं) लि.यांचे कडून त्यांचे देकाराविषयी स्पष्टीकरण मागविले. त्याअनुषंगाने मे. अहलुवालिया कॉन्ट्रॅक्ट्स (इं) लि. यांनी दि. ०८/१०/२०२० च्या पत्रान्वये सादर केलेले स्पष्टीकरणात खालील बाबींमुळे दिलेला देकार १६.९०% अधिक दराचा असल्याचे नमूद केले आहे.

- निविदा किंमत ही बाजारभावापेक्षा कमी आहे.
- निविदामध्ये दर सूचीनुसार महानगरपालिका क्षेत्रातील वाढीव ५% व प्राधिकरण क्षेत्रातील वाढीव २% दर घेण्यात आलेले नाही.
- निविदेमध्ये सध्यस्थितीतील कामावरील परस्थिती विचारात (जसे अंतर्गत रस्ते, सुरक्षा रक्षक इत्यादी) घेण्यात आलेली नाही.
- राज्य दरसूचीमध्ये कंत्राटदाराची सर्व जोखीम विमा व तृतीय पक्ष विमा घेण्यात आलेला नाही तसेच कामगार कल्याण कर घेण्यात आलेला नाही.
- राज्य दरसूचीमध्ये महानगरपालिकेमधील करांचा खर्च, प्रयोगशाळा तपासणी इत्यादी बाबींचा खर्च घेण्यात आलेला नाही.
- कोव्हीड-१९ मुळे सध्यस्थितीत मजूरांचे दर १० ते १५ % वाढलेले आहेत.

६.७. अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी असे नमूद केले की, साधारण सल्लागार मे. AICA Consortium यांचा प्राथमिक आर्थिक छाननी अहवाल निविदा शिफारस समितीच्या दि. ०९/१०/२०२० रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला. सदर बैठकीत वरील स्पष्टीकरणावर चर्चा करण्यात आली. त्यानंतर, अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी साधारण सल्लागार यांना लघुत्तम निविदाकाराने सादर केलेल्या स्पष्टीकरणाबाबत पडताळणी करुन अहवाल सादर करण्यास सुचविले. त्यानुसार साधारण सल्लागाराने सादर केलेल्या अहवालानुसार निविदाकाराने सादर केलेल्या आवश्यक बाबी विचारात घेता, खाली दिलेल्या तक्त्याप्रमाणे निविदा किंमतीवर १४.११% अधिक दर वाजवी ठरेल असे सुचविले आहे.

| अनु.क्र. | वाढीव खर्चाच्या कारणांचा तपशील | % वाढ |
|---|---|---|
| १ | राज्य दरसूची २०१९-२०२० मध्ये नमूद केल्याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील ५% वाढीव दर व दरसूचीमध्ये नमूद न केलेल्या बाबीं तसेच जानेवारी-२०२० ते ऑक्टोबर, २०२० झालेले भाववाढ याबाबींचा विचार करता अंदाजपत्रकामध्ये होणारी वाढ. | ९.६१% |
| २ | बांधकामात वापरण्यात येणाऱ्या सळईसाठी आवश्यक असणारे लॅप, चेअर, मेकनिकल प्लाईसेस, पीन्स् तसेच स्पेस बार्स (सळईच्या जवळपास ५%) यामुळे अंदाजपत्रकामध्ये होणारी वाढ. | १.५०% |
| ३ | डेपोमधील अंतर्गत रस्त्याचा विकास व दुरूस्ती, पोहोच रस्ता, आजूबाजूच्या झोपडीपट्टीमुळे सुरक्षेमध्ये होणारी वाढ, संपुर्ण डेपो प्रकाशमय करणे व डेपोच्या बाजूला असणारी दलदलीची जागा (भरतीसंबंधीचा प्रभाव) इत्यादीमुळे अंदाजपत्रकामध्ये होणारी वाढ. | ३.००% |
| | **एकूण अंदाजपत्रकामध्ये होणारी वाढ (टक्केवारी)** | **१४.११%** |

साधारण सल्लागाराने सादर केलेल्या अहवालाची तपासणी संचालक (प्रकल्प) व मुख्य अभियंता यांचेकडून करण्यात आली असून १४.११% अधिक दरापर्यंतचा देकार स्विकारण्यास समितीस शिफारस केली आहे. त्यानंतर निविदा शिफारस समितीने लघुत्तम निविदाकाराला वाटाघाटी करण्यासाठी बोलाविले. लघुत्तम निविदाकाराने त्यांचा देकार उपरोक्त परिच्छेद क्र.६.६ मध्ये दिलेल्या कारणास्तव त्यांचा देकार अत्यंत वाजवी आहे असे सुचविले. सखोल चर्चेनंतर

अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी निविदाकारास त्यांच्या देकाराबाबत पुनर्विचार करुन अंतिम देकार सादर करावा, असे सुचविले. त्यानुषंगाने निविदाकारानी दि. १०/१०/२०२० च्या पत्रान्वये सुधारित देकार खालील प्रमाणे सादर केला :-

| **कंत्राटदारांचे नाव** | **निविदेची रक्कम (रु.) (वस्तू व सेवा करासह)** | **प्राप्त देकार (रु.) (वस्तू व सेवा करासह)** | **% कमी/अधिक (-/+)** |
|---|---|---|---|
| मे. अहलुवालिया कॉन्ट्रक्स (इं) लि. | ४६४,७५,११,४२४.५० | ५३०,३२,८८,०३२.०० | १४.११% (अधिक) |

लघुत्तम निविदाकाराने सादर केलेला सुधारित देकार वाजवी व रास्त असून निविदा शिफारस समितीने सुधारित देकार स्विकृत करण्याची शिफारस केली.

मा. मुख्य सचिव आणि अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी निविदेमध्ये वाढ झालेल्या किंमतीबाबत विचारणा केली. या विषयावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, निविदा अंदाजपत्रकाची तुलना महाराष्ट्र शासन दरसूची २०१९-२०२० बरोबर केल्यानंतर निविदा किंमतीत सुमारे ९.६१% इतकी वाढ होत आहे. तसेच बांधकामात वापरण्यात येणाऱ्या सळईसाठी आवश्यक असणारे लॅप, इत्यादीमुळे अंदाजपत्रकामध्ये १.५०% इतकी वाढ होत आहे. तसचे डेपोमधील अंतर्गत रस्त्याचा विकास व दुरूस्ती, पोहोच रस्ता, आजूबाजूच्या झोपडीपट्टीमुळे सुरक्षेमध्ये होणारी वाढ, संपुर्ण डेपो प्रकाशमय करणे व डेपोच्या बाजूला असणारी दलदलीची जागा (भरतीसंबंधीचा प्रभाव) इत्यादीमुळे अंदाजपत्रकामध्ये ३% इतकी वाढ होत आहे.

लघुत्तम निविदाकाराने सादर केलेला सुधारित देकार निविदा किंमतीच्या १४.११% अधिक म्हणजेच, रु. ६६.१३ कोटी जास्त आहे. आधीच्या कंत्राटदाराची सुरक्षा अनामत रक्कम जप्त केल्यामुळे प्राधिकरणास रु.४२.९० कोटी निधी प्राप्त झाला आहे.

वरील बाबीं विचारात घेता लघुत्तम निविदाकाराचा एकुण १४.११% अधिक दराचा सुधारित देकार स्विकारार्ह आहे, असे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

**निर्णय: चर्चेनंतर, बाब टिपणीतीत प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-**

**<u>ठराव क्र. १३९६ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उप कलम (३) चे पोट कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मेट्रो मार्ग २ब प्रकल्पातील पॅकेज सी - १०३ मंडाळे येथील कारशेड बांधकामासाठी मे.अहलुवालिया कॉन्ट्रॅक्ट्स (इं) लि. यांनी सादर केलेला रु. ५३०,३२,८८,०३२.०० किंमतीचा (वस्तू व सेवा करासह) (अधिक १४.११ % दराचा) सुधारित लघुत्तम देकार स्विकारण्यास व त्याअनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटी व शर्तीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामाची निकड लक्षात घेता बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता काम तात्काळ सुरू करण्यास सुध्दा मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र. ७</u>: <u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील प्रमुख, नगर नियोजन, भाडे तत्त्वावरील घरे" या पदाचे पदनाम "प्रमुख, नगर नियोजन-२" असे करण्यास तसेच सदर पदाचे सेवाप्रवेश नियमास मंजूरी मिळणेबाबत.</u>**

७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर.आयुक्तांनी असे सांगितले की मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ३ ऑगस्ट,२००९ रोजी झालेल्या १२५ व्या बैठकीतील ठराव क्र. १२१७ अन्वये भाडे तत्वावरील घरे विभाग स्थापन करण्यास तसेच सदर विभागाकरीता **"प्रमुख नगर नियोजक, भाडेतत्वावरील घरे"** हे पद निर्माण करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे. **भाडेतत्वावरील** ही योजना २०१४ साली शासनाने बंद केलेली आहे. परंतू त्या संदर्भातील कामे सूरू असल्यामुळे सर्व योजनांचे बांधकाम पूर्ण होत नाही तोपर्यंत त्या संदर्भातील कामे

सदर विभागामार्फत हाताळली जाणार आहेत प्राधिकरणाच्या प्रादेशिक क्षेत्रात वाढ झाल्याने नगर नियोजन विभागाच्या कामकाजात वाढ झाली आहे. यास्तव **"प्रमुख, नगर नियोजक, भाडे तत्वावरील घरे"** या पदाचे पदनाम **"प्रमुख, नगर नियोजन-२"** असे करण्यास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

७.२ महानगर आयुक्तांनी असे, नमूद केले की, "**प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन**" व "**प्रमुख, नगर नियोजन**" यांचे सेवाप्रवेश नियम सारखे आहेत. त्याचधर्तीवर "**प्रमुख, नगर नियोजन-२**" या पदाचे सेवाप्रवेश नियम उपरोक्त २ पदांप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे. "**प्रमुख, नगर नियोजन-२**" पदाचे खालील सेवाप्रवेश नियम कार्यकारी समितीच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.

| मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील **"प्रमुख, नगर नियोजन-२"** या पदावरील नेमणूक सरळसेवेने अथवा पदोन्नतीने, योग्य व्यक्तीच्या सक्त निवडीने अथवा पदोन्नतीने खालील व्यक्तीमधून करण्यात येईल. | | |
|---|---|---|
| शैक्षणिक अर्हता | : | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वास्तूविशारद (बी.आर्च.) किंवा स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी किंवा तत्सम<br>आणि<br>२) मान्यताप्राप्त विद्यापीठ/संस्थेची नगर नियोजन, नगर रचना किंवा नगर व प्रादेशिक नियोजन मधील पदव्युत्तर पदवी/पदविका |
| अनुभव | : | पदव्युत्तर पदवी धारण केल्यानंतर किमान १५ वर्षे नगर नियोजनाचे कामकाज हाताळण्याचा अनुभव धारण करणा-या व्यक्ती अथवा १० वर्षे जबाबदारीच्या पदावर कामकाज हाताळण्याचा अनुभव असणारी व्यक्ती<br>किंवा<br>एस-२७ रू ११८५००- २१४१०० (सातव्या वेतन आयोगानुसार) या वेतनश्रेणीत कार्यरत असलेले"सह प्रकल्प संचालक (नगर नियोजन)","अति.प्रमुख(नगर व क्षेत्र नियोजन)" अति प्रमुख (अर्बन डिसाईन) या पदावर किमान 5 वर्षाचा अनुभव धारण करत असलेली व्यक्ती |
| वय | : | ५० वर्षापेक्षा जास्त नसावे. प्राधिकरणातील कर्मचा-यास वयाची अट लागू नाही. |
| वेतनश्रेणी | : | एस-२९ रू १३११००- २१६६००/- (सातव्या वेतन आयोगानुसार) |

७.३ सदर नमुद तिन्ही प्रमुखांची पदे समकक्ष असल्याने अतंर्गत बदली करण्यास मान्यता देण्याची विनंती करण्यात आली.

**निर्णय: चर्चेनंतर, बाब टिपणीतीत प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-**

**ठराव क्र. १३९७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की**, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (एक) अन्वये प्राप्त झालेल्या व यासंबंधी सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे **"प्रमुख, नगर नियोजक, भाडे तत्वावरील घरे"** या पदाचे पदनाम **"प्रमुख, नगर नियोजन-२"** असे करण्यास व **"प्रमुख, नगर नियोजन-२"** या पदाचे बाब टिप्पणीतील उल्लेख केलेल्या खालील सेवाप्रवेश नियमास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच, सदर कामाची निकड लक्षात घेता बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता काम तात्काळ सुरू करण्यास सुध्दा मान्यता देत आहे:-

| मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील **"प्रमुख, नगर नियोजन-२"** या पदावरील नेमणूक सरळसेवेने अथवा पदोन्नतीने, योग्य व्यक्तीच्या सक्त निवडीने अथवा पदोन्नतीने खालील व्यक्तीमधून करण्यात येईल. | | |
|---|---|---|
| शैक्षणिक अर्हता | : | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वास्तूविशारद (बी.आर्च.) किंवा स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी किंवा तत्सम<br>आणि<br>२) मान्यताप्राप्त विद्यापीठ/संस्थेची नगर नियोजन, नगर रचना किंवा नगर व प्रादेशिक नियोजन मधील पदव्युत्तर पदवी/पदविका |
| अनुभव | : | पदव्युत्तर पदवी धारण केल्यानंतर किमान १५ वर्षे नगर नियोजनाचे कामकाज हाताळण्याचा अनुभव धारण करणा-या व्यक्ती अथवा १० वर्षे जबाबदारीच्या पदावर कामकाज हाताळण्याचा अनुभव असणारी व्यक्ती<br>किंवा<br>एस-२७ रू ११८५००- २१४१०० (सातव्या वेतन आयोगानुसार) या वेतनश्रेणीत कार्यरत असलेले"सह प्रकल्प संचालक (नगर नियोजन)","अति.प्रमुख(नगर व क्षेत्र नियोजन)" अति प्रमुख (अर्बन डिझाईन) या पदावर किमान 5 वर्षाचा अनुभव धारण करत असलेली व्यक्ती |
| वय | : | ५० वर्षापेक्षा जास्त नसावे. प्राधिकरणातील कर्मचा-यास वयाची अट लागू नाही. |
| वेतनश्रेणी | : | एस-२९ रू १३११००- २१६६००/- (सातव्या वेतन आयोगानुसार) |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की, "प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन"**, **"प्रमुख नगर नियोजन"** व **"प्रमुख नगर नियोजन-२"** या पदांचे कामकाजाचे स्वरूप

एकसारखे असल्याने सदरची तीन पदे समकक्ष आहेत यास्तव सदर प्रमुखांची पदे अंतर्गत बदली करण्यास मंजूरी देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**बाब क्र.८: महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर सह-अध्यक्ष व इतर दोन तज्ञ सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबत.**

८.१. या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेचे सह-अध्यक्ष तसेच २ सदस्य यांचा सदस्यत्वाचा कालावधी अनुक्रमे दिनांक ८ मार्च, २०२० व दिनांक १० मे, २०२० रोजी संपलेला आहे. महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेच्या नियमावलीनुसार सदर संस्थेचे सह-अध्यक्ष पदावर नामांकीत व्यक्तीचे नामनिर्देशन प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने करावयाचे असते. तसेच पर्यावरण शिक्षण, वनस्पती शास्त्र, सागरी जीवन आणि भूदृश्य (Land scaping) ह्या क्षेत्रांमध्ये तज्ञ असलेल्या ३ विशेषज्ञ व्यक्तींचे सभासद म्हणून नामनिर्देशन प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने करावयाचे असते. अशा नामनिर्देशित सदस्यांचा कालावधी ३ वर्षाचा असतो. त्यानुसार महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर रिक्त झालेल्या सह-अध्यक्ष व इतर २ सदस्यांचे जागी नामनिर्देशन करण्यात यावे अशी कार्यकारी समितीस विनंती आहे.

८.२. चर्चेनंतर, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर रिक्त झालेल्या सह-अध्यक्ष व २ सदस्यांचे जागी नव्याने नामनिर्देशन करण्याचे अधिकार कार्यकारी समितीने मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांना प्रदान केले.

**निर्णय: चर्चेनंतर, बाब टिपणीतीत प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-**

**ठराव क्र. १३९८ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर रिक्त झालेल्या सह-अध्यक्ष या पदावर नामांकीत व्यक्तीची व २ तज्ञ व्यक्तींचे नामनिर्देशन हे पर्यावरण शिक्षण, वनस्पती शास्त्र, सागरी जीवन आणि भूदृश्य (Land scaping) या विषयातील तज्ञ असतील

अशा व्यक्तींची तज्ञ सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्याचे अधिकार मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांना याद्वारे प्रदान करण्यात येत आहेत.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ९अ: मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१८ ते दिनांक ३१ मार्च, २०१९**

९.१ मुंबई नागरी विकास प्रकल्प –फिरता निधीच्या दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१८ ते दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय: मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र. ९ब: मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल दिनांक ०१ एप्रिल, २०१९ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१९**

९.१ मुंबई नागरी विकास प्रकल्प –फिरता निधीच्या दिनांक ०१ एप्रिल, २०१९ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ रोजीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय: मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र.१०अ: प्राधिकरणाचे दिनांक ३०.१२.२०१९ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**निर्णय: सदर गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र.१०ब: प्राधिकरणाचे दिनांक ३१.०३.२०२० रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**निर्णय: सदर गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र.११: प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल – दिनांक ०१ एप्रिल, २०२० ते ३० जून, २०२०.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ०१ एप्रिल, २०२० ते दिनांक ३० जून, २०२० दरम्यान केलेल्या गुंतवणूकीची संक्षिप्त माहिती दिली. कार्यकारी समितीने दिनांक ०१ एप्रिल, २०२० ते दिनांक ३० जून, २०२० पर्यंतच्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेतली.

**निर्णय: सदर गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**पटल बाब क्र.१: सांताक्रुझ-चेंबुर जोडरस्त्यांतर्गत कुर्ला ते वाकोला या उन्नत मार्गाच्या (भाग-१) कामामध्ये करावयाच्या अतिरिक्त कामास, मुदत वाढीस तसेच मुंबई महानगरपालिकेमार्फत उपलब्ध होणाऱ्या निधीतून प्राधिकरणामार्फत करावयाच्या कामांस मान्यता देणेबाबत.**

१.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या दि. २६/०८/२०१५ रोजीच्या १३८ व्या बैठकीमध्ये वांद्रे-कुर्ला संकुलाचा भविष्यात होणारा विस्तार पहाता खालील दोन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे.

**भाग-१** : सांताक्रुझ चेंबुर जोड रस्त्यामध्ये वाकोला जंक्शन, आंबेडकर चौक, युनिव्हर्सिटी जंक्शन व बीकेसी जंक्शन मिळून कुर्ला ते वाकोला पुलाला जोडणारा उन्नत मार्ग बांधणे.

**भाग-२** भारत डायमंड कंपनी, वांद्रे-कुर्ला संकुल ते वाकोला जंक्शन उन्नत मार्ग बांधणे.

प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने भाग-१ च्या कामास दि. २१/०७/२०१५ रोजी झालेल्या २४५ व्या बैठकीत मान्यता दिलेली असून सदर कामाचा कार्यादेश मे. जे कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांना दिनांक २७/१०/२०१६ रोजी देण्यात आलेला आहे.

सदर कंत्राटाची किंमत रु. ४४९.१९ कोटी इतकी आहे व मुळ काम पूर्ण करण्याचा कालावधी ३६ महिने (पावसाळयासहीत) इतका होता. सद्य:स्थितीत भाग-१ चे काम ५५% पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. तसेच सदर कामाच्या प्रशासकीय मान्यतेमध्ये सेवा वाहिन्या स्थलांतरीत करण्याकरीता रु. १९.६९८ कोटी व आकस्मित खर्चाकरीता रु. १९.६९८ कोटी अशी एकूण रु. ३९.४० कोटीची तरतूद करण्यात आली होती. सदर तरतूदीच्या अनुषगांने हंगामी रक्कम (Provisional sum) म्हणून कंत्राटामध्ये रु. ८.२६ कोटी इतक्या रक्कमेची अंदाजे तरतूद करण्यात आलेली होती. सदर प्रकल्पामध्ये सेवा वाहिन्यांच्या स्थलांतरामध्ये अंदाजिय रक्कम वाढण्याचे मूळ कारण हे मुंबई विद्यापिठाकडून रस्त्याची मध्यरेषा (Center line) स्थलांतरीत करण्यात आली हे आहे. तसेच इतर अतिरिक्त कामाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | अतिरिक्त कामाचा तपशिल | कामाची किंमत (रु.) |
|---|---|---|
| १ | पाईल फाऊंडेशनच्या खोलीमध्ये झालेली वाढ | १२,२८,४६,४८७/- |
| २ | पाईल फाऊंडेशनमध्ये बाधित मलनिसा:रण वाहिन्यांचे स्थलांतरण करणे. | १२,४६,१७,५१७/- |
| ३ | पाईल फाऊंडेशनमध्ये बाधित जल वाहिन्यांचे स्थलांतरण करणे | १४,९३,१६,८९४/- |
| ४ | संरक्षक भिंत (रिटेनिंग वॉल सहित) चे बांधकाम करणे. | १,२८,१८,६५०/- |
| ५ | १२०० मिमी व्यासाची पर्जन्य जलवाहिनीचे काम करणे. | २,८६,२३,७८४/- |
| ६ | डेकच्या क्षेत्रफळामध्ये झालेल्या वाढीमुळे लागणारा अतिरिक्त खर्च | १३,२२,३६,२००/- |
| ७ | वाकोला आर्म चे पानबाई इंटरनेशनल शाळेपर्यंत विस्तारीकरण करणे. | २४,७२,२५,८२१/- |
| ८ | केबल स्ट्रेस (cable stress) च्या सहाय्याने वाकोला पुलाच्या वरुन जाणा-या वाकोला पोहोच मार्गाचे बांधकाम करणे. | २७,८८,९५,१३८/- |
| | **एकूण रक्कम (अ)** | **१०९,६५,८०,४९२/-** |
| ९ | मिठी नदीवरील पुलाच्या कामाचे नुतनीकरण व रुंदीकरण करणे | ५१,८१,००,०००/- |
| १० | हंसबुग्रा मार्गावरील पाईप लाईन व वाकोला नाल्यावरील पुलाचे रुंदीकरण व नुतनीकरण करणे. | २९,४८,००,०००/- |
| ११ | बुलेट ट्रेनमध्ये बाधित होत असलेल्या पुलाच्या स्पॅनची वाढलेली लांबी | ५,८२,००,०००/- |
| | **एकूण रक्कम (ब)** | **८७,११,००,०००/-** |

१.२ अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी असेही नमुद केले की, सदर प्रकल्पामध्ये मुंबई विद्यापिठाकडून रस्त्याची मध्यरेषा (Center Line) स्थलांतरीत करण्यात आल्यामुळे व सेवा वाहिन्यांचे स्थलांतर केल्यामुळे अनु.क्र. १ ते ६ बाबींमुळे अतिरिक्त कामे हाती घेण्यात आली व तसेच मुंबई पोलिस, वाहतुक विभागाच्या सुचनेनुसार अनु. क्र. ७ व ८ ची अतिरीक्त कामे हाती घेण्यात आली व तसेच अनु. क्र. ९ व १० ही दोन्ही पुलांची कामे कुर्ला वाकोला

उन्नत मार्गासोबत करण्यात यावे असा एकत्रित निर्णय महानगर आयुक्त व बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांच्याकडून घेण्यात आला, अनु. क्र. ९ एम.टी.एन.एल. आर्मच्या दोन पियर खालून बुलेट ट्रेन (एन.एच.एस.आर.सी.एल) संकल्पना करण्यात आली. त्याकरीता एन.एच.एस.आर.सी.एल. ने अतिरिक्त खर्च प्राधिकरणास दिला.

प्राधिकरणाच्या २६२ व्या बैठकीमध्ये मिठी नदीचे काम मे. जे.कुमार यांचेकडून करण्याकरीता महानगर आयुक्तांचे २०% खर्चाचे अधिकार अबाधित ठेवून मान्यता घेण्यात आली.

तसेच कामात होत असलेल्या अतिरिक्त कामे, प्रकल्पबाधित वृक्ष तोडणे/स्थलांतर, जलवाहिन्या व मलनिसा:रण वाहिन्या, प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन यांच्याकरीता झालेल्या विलंबामुळे व काम पूर्ण करण्यास कंत्राटदारास ३१ मार्च, २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी.

१.३ वरील सर्व बाबींचे अवलोकन करता मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प अंतर्गत सांताक्रुझ - चेंबूर जोडरस्त्यामध्ये वाकोला जंक्शन, आंबेडकर चौक, युनिर्व्हसिटी जंक्शन व बि.के.सी. जंक्शन मिळून मिठी नदी ते वाकोला पुलाला जोडणारा उन्नत मार्गाच्या (भाग-१) कामामध्ये करावयाच्या अतिरिक्त कामास, मुदत वाढीस तसेच, इतर संस्थाकडून उपलब्ध होणा-या निधितून प्राधिकरणामार्फत करावयाच्या कामांस मान्यता प्रदान करणे तसेच याअनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करणे असा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

कार्यकारी समितीस विनंती करण्यात येते की, भाग-१ च्या कंत्राटात खालील बाबींस मान्यता देण्यात यावी :-

१. मुळ कामाव्यतिरीक्त अतिरिक्त बाबीकरीता लागणारा खर्च रु. १०९,६५,८०,४९२ /- म्हणजेच कंत्राटाच्या मुळ किंमतीच्या २४.४१% अधिक इतका.

२. बृहन्मुंबई महानगरपालिका व एन.एच.एस.आर.सी.एल. यांचेकडून उपलब्ध होत असलेल्या निधीतून रु. ८७,११,००,०००/- इतक्या रक्कमेची कामे प्राधिकरणामार्फत भाग-१ च्या कंत्राटदाराकडून करुन घेण्यात येत आहेत.

३. अतिरिक्त कामे तसेच मुळ काम पूर्ण होण्यास होत असलेला विलंब यामुळे कंत्राटदारास ३१ मार्च, २०२२ पर्यंत मुदत वाढ देणे.

..३२/-

कार्यकारी समितीस विनंती करण्यात येते की, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देऊन खालील ठराव बदलासह किंवा बदलाशिवाय मंजूर करण्यात यावा.

**निर्णय: चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावाला मान्यता देऊन कार्यकारी समितीनी पुढील ठराव मंजूर केला.**

**ठराव क्र. १३९९ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प अंतर्गत सांताक्रुझ - चेंबूर जोडरस्त्यामध्ये वाकोला जंक्शन, आंबेडकर चौक, युनिर्व्हसिटी जंक्शन व बि.के.सी. जंक्शन मिळून मिठी नदी ते वाकोला पुलाला जोडणारा उन्नत मार्गाच्या (भाग-१) कामामध्ये करावयाच्या अतिरिक्त कामास, मुदत वाढीस तसेच इतर संस्थाकडून उपलब्ध होणा-या निधीतून प्राधिकरणामार्फत करावयाच्या कामांस भाग-१ च्या कंत्राटामध्ये खालील बाबींस मान्यता देण्यात येत आहे:-

१. मुळ कामाव्यतिरीक्त अतिरिक्त बाबीकरीता लागणारा खर्च रु. १०९,६५,८०,४९२/- म्हणजेच कंत्राटाच्या मुळ किंमतीच्या २४.४१ % अधिक इतका.

२. बृहन्मुंबई महानगरपालिका व एन.एच.एस.आर.सी.एल. यांचेकडून उपलब्ध होत असलेल्या निधीतून रु. ८७,११,००,०००/- इतक्या रक्कमेची कामे प्राधिकरणामार्फत भाग-१ च्या कंत्राटदाराकडून करून घेण्यात येत आहेत.

३. अतिरिक्त कामे तसेच मुळ काम पूर्ण होण्यास होत असलेला विलंब यामुळे कंत्राटदारास ३१ मार्च, २०२२ पर्यंत मुदतवाढ देणे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की**, सदर कामाची निकड लक्षात घेता बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता काम तात्काळ सुरू करण्यास सुध्दा मान्यता देत आहे

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** उपरोक्त खर्चास प्राधिकरणाची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

"**आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**पटल बाब क्र.२ : मेट्रो मार्गाच्या प्रकल्पाची विहीत कालावधीत अंमलबजावणी करण्याकरीता संचालक (प्रणाली) या संवर्गाकरीता सेवानिवृत्त उमेदवाराचे वय वर्ष ६१ पेक्षा जास्त नसावे.**

२.१. सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणारे महात्वाकांक्षी प्रकल्प विहित कालमर्यादेचे असल्याने मेट्रो प्रकल्पावरील संचालक (प्रणाली) या वरिष्ठ संवर्गातील पदावर विशिष्ट आणि प्रदीर्घ अनुभव असणा-या अधिका-यांच्या सेवा आवश्यक आहेत. मागील दोन महिन्याच्या कालावधीमध्ये संचालक (प्रणाली) यांचे दि.३१ जुलै, २०२० रोजी तसेच वरिष्ठ संचालक (एकात्मिक प्रणाली) यांचे दि.२ ऑक्टोबर, २०२० रोजी आकस्मिक निधन झाले. संचालक (प्रणाली) या रिक्त पदाकरीता दिनांक ८ ऑगस्ट, २०२० रोजी वर्तमानपत्रात आणि प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन सरळसेवा / प्रतिनियुक्तीने नेमणूकीकरीता अर्ज मागविण्यात आले होते. परंतू सदर जाहिरातीस अनुलक्षून पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने, पुन्हा दि.१३ ऑक्टोबर, २०२० रोजी फेर जाहिरात देण्यात आलेली आहे.

२.२ प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणारे महात्वाकांक्षी प्रकल्प विहित कालमर्यादेचे असल्याने व मेट्रो मार्गिका २-अ व ७ यांचे काम अंमित टप्प्यात असल्याने, मेट्रो प्रकल्पावरील संचालक (प्रणाली) हे पद रिक्त असणे सदर प्रकल्पासाठी हितावह नाही तसेच या पदावर विशिष्ट आणि प्रदीर्घ अनुभव असणा-या अधिका-यांची आवश्यकता आहे व जाहिरातीस प्रतिसाद न मिळाल्याने प्राधिकरणास सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा प्राप्त करणे गरजेचे आहे. तथापि सेवानिवृत्त अधिकारी देखील त्यांना देण्यात येणा-या वेतनामुळे प्राधिकरणात रुजू होण्यास उत्सुक नाही. ही बाब समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आली व या भरती वर्षाकरीता भारतीय रेल्वे बोर्डातील सेवानिवृत्त उमेदवार अर्ज करू शकतील, यास्तव वय वर्ष ६१ पेक्षा जास्त नसलेल्या सेवानिवृत्त उमेदवाराची नियुक्ती / नेमणुका करण्यास अनुमती देणेबाबत विनंती केली. रेल्वेतील सेवानिवृत्त अधिकारी यांचे वेतन बाबत मा.मुख्य सचिव यांनी विचारणा केल्यावर, वेतन-वजा-निवृत्तीवेतन या पध्दतीमुळे सेवानिवृत्त अधिकारी देखील उपलब्ध नसल्याचे महानगर आयुक्त यांनी निर्देशनास आणून दिल्यानंतर, मा.मुख्य सचिव यांनी रेल्वेतील सेवानिवृत्त अधिका-यांना त्यांचे निवृत्तीच्या वेळेचे वेतन दिल्यास अधिकारी उपलब्ध होतील असे सुचविले.

२.३ चर्चेनंतर, कार्यकारी समितीने प्रस्तावाला मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला.

**निर्णय: चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावाला मान्यता देऊन कार्यकारी समितीनी पुढील ठराव मंजूर केला.**

**ठराव क्र. १४०० :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मेट्रो प्रकल्पामधील संचालक (प्रणाली) या संवर्गाकरीता अनुभवी उमेदवार आवश्यक असल्याने या भरती वर्षाकरीता भारतीय रेल्वे बोर्डातील सेवानिवृत्त उमेदवार अर्ज करू शकतील, यास्तव वय वर्ष ६१ पेक्षा जास्त नसलेल्या सेवानिवृत्त उमेदवाराची नियुक्ती / नेमणूक करण्यास तसेच रेल्वे विभागातील सेवानिवृत्त अधिका-यांना त्याच्या सेवानिवृत्ती दिनांकाचे वेतन देण्यास कार्यकारी समिती याद्वारे मान्यता प्रदान करीत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*********